<u>प्रेसनोट</u> दि. १४/०५/२०२५

**अ‍ॅन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून पुणे ग्रामीण पोलीस घटकातील बारामती तालुका पोलीस स्टेशन येथील सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. १९०/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७अ, १२ अन्वये |
| तक्रारदार | पुरुष, वय २६ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री. सुनिल माणिक जगताप, वय ५६ वर्ष, पद - सहायक पोलीस उपनिरीक्षक, बारामती तालुका पो. स्टे. पुणे ग्रामीण (वर्ग-३, अराजपत्रित)<br>२) श्री. प्रविण भाऊसाहेब भोसले, य ३९ वर्ष (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०,०००/- (तीस हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | सुरवातीला १५,०००/- रुपये व तडजोडीअंती १०,०००/- (दहा हजार) रुपये |
| लाच मागणी पडताळणी दिनांक | १८/०३/२०२५, दि. १९/०३/२०२५, दि. २०/०३/२०२५ व दि. २४/०३/२०२५ |
| ठिकाण | बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. प्रविण निंबाळकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९५५२५७४१४० ) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे चालवत असलेल्या मोटार वाहनाचा अपघात झाला होता. सदर अपघाताचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व वाहन सोडवण्यासाठी यातील लोकसेवक सुनिल जगताप यांनी तक्रारदाराकडे ३०,००० रुपयाच्या लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार दि. १८/०३/२०२५ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. १८/०३/२०२५, दि. १९/०३/२०२५, दि. २०/०३/२०२५ व दि. २४/०३/२०२५ रोजी लोकसेवक सुनिल जगताप यांचेकडे पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, त्या दरम्यान त्यानी तक्रारदारावर अपघाताचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व वाहन सोडवण्यासाठी तक्रारदाराकडे सुरवातीस १५,००० रुपयाची लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती १०,००० रुपयाची लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केले. तसेच सदर लाच मागणीस खाजगी इसम प्रविण भोसले यांनी अपप्रेरणा दिल्याचे निष्पन्न झाल्याने, दोघांविरुद्ध आज दि. १४/०५/२०२५ रोजी बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गु.रं.नं. १९०/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ७अ, १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन अ‍ॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(सही) १४/५/२५

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

(शिक्का: सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, सत्यमेव जयते)

Scanned with CamScanner